# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी
# जिल्हा - ठाणे.

**<u>नागरीकांना जाहिर आवाहन</u>**

सद्या चीनमध्ये Human Metapnemovirus (HPMV) उद्रेक झाल्याच्या बातम्या येत आहेत. मानवी मेटान्युमोव्हायरस (एचएमपीव्ही) तीव्र श्वसन संसर्गाचे एक प्रमुख कारण आहे. हा विषाणू सर्व प्रथम नेदरलँड्स मध्ये 2001 मध्ये आढळला. मानवी मेटान्युमोव्हायरस (एचएमपीव्ही) हा एक सामान्य श्वसन विषाणू आहे. ज्यामुळे श्वसनमार्गाच्या वरील भागातील संसर्गास (सर्दीसारख्या) कारणीभूत ठरते. हा एक हंगामी रोग आहे जो सामान्यतः आरएसव्ही आणि फ्लू प्रमाणेच हिवाळा आणि उन्हाळयाच्या सुरुवातीला उद्भवतो. तथापी खबरदारी म्हणून नागरीकांनी श्वसनाचे संसर्गापासून बचाव करण्यासाठी काय करावे आणि काय करु नये या सदंर्भातील सूचनांचे पालन करण्याचे आवाहन वैद्यकिय आरोग्य विभागा कडून करण्यात येत आहे.

हे करा :

➤ जेव्हा आपल्याला खोकला किंवा शिंका येत असेल तेव्हा आपले तोंड आणि नाक रुमाल किंवा टिश्यू पेपरने झाका.

साबण आणि पाणी किंवा अल्कोहोल आधारित सॅनिटायझरने आपले हात वारंवार धुवा.

> ताप, खोकला आणि शिंका येत असल्यास सार्वजनिक ठिकाणांपासून दूर रहा.

> भरपूर पाणी प्या आणि पौष्टिक खा.

> संक्रमण कमी करण्यासाठी सर्व ठिकाणी पुरेसे वायुविजन (व्हेंटीलेशन) होईल. याची दक्षात घ्या.

हे करु नये :

> हस्तांदोलन

> टिश्यु पेपर आणि रुमालाचा पुनर्वापर

> आजारी लोकांशी जवळचा संपर्क

> डोळे, नाक आणि तोडाला वारंवार स्पर्श करणे.

> सार्वजनिक ठिकाणी धुंकणे.

> डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषधे (सेल्फ मेडिकेशन) घेणे.

चीनमधून आलेला नवीन विषाणू Human Metapnemovirus (HPMV) अहवालांबाबत चिंतेचे कारण नाही याबाबत आवश्यक दक्षता घेण्यात येत असून नाहक भितीचे वातावरण निर्माण करुन कोणत्याही अफवाना बळी पडू नये व या आजारा संदर्भात शंका आल्यास त्वरीत आपले जवळचे नागरी आरोग्य केंद्र व शासनाचे रुग्णालयाशी संपर्क साधावा. असे सहकार्य करण्याचे आवाहन मा.प्रशासक तथा आयुक्त सा◌ो., मा. वैद्यकिय आरोग्य अधिकारी सा◌ो. भिवंडी महापालिका यांचे कडून करण्यात येत आहे.

जनसंपर्क अधिकारी
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका